# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasnagar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /११५ Ext. No. १३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा. क्र. उमपा/करवि/यु ०६/ २४ /२०२४

दिनांक- २२/०७/२०२४

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकांत शॉप नं. ५४ मेन रोड, उल्हासनगर-४(मालमत्ता क्रमांक ४१सीओ००९३७३४००) व शॉप नं. ५५ मेन रोड, उल्हासनगर-४(मालमत्ता क्र.४१सीओ००९३७३५००) अन्वये नोंद असलेल्या मालमत्तांकरिता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून विणा चंदर छाब्रिया तसेच हिरेश चंदर छाब्रिया अशी नोंद आहे.

उक्त् मिळकतीमध्ये डीजी १ इलेक्ट्रॉनिक्स् प्रायवेट लिमिटेड वापर करीत असल्याने भाडेप्रमाणे कर आकारणी सुरु आहे.

तथापि, श्रीम. विना चंदर छाब्रिया, शॉप नं. ५४,कॅनरा बँक समोर, मेन रोड, सेक्शन २५, उल्हासनगर-४ यांनी दि. ०७/०८/२०२३ रोजीचे (टोकन क्र. ४१२०२३०००१३६५४) अर्जान्वये सदर मिळकती डीजी १ इलेक्ट्रॉनिक्स् प्रायवेट लिमिटेड यांनी दिनांक ३१/०३/२०२४ रोजी रिकामी केलेनुसार कर आकारणी सुधारित करुन देणे बाबत विनंती केली आहे. सोबत डीजी १ इलेक्ट्रॉनिक्स् प्रायवेट लिमिटेड यांचेकडील मिळकत रिकामी करणे बाबतचे दि. ३१/०३/२०२३ रोजीचे पत्राची प्रत सादर केली आहे.

श्री. हिरालाल जी कुकरेजा यांनी दि. २८/०६/२०२३ रोजी केलेल्या पत्राच्या अनुषंगाने संबंधित कर निरीक्षक यांनी दि. ११/०७/२०२४ रोजी सदर मिळकतीची पाहणी केली असता सदर मिळकती डीजी १ इलेक्ट्रॉनिक्स् प्रायवेट लिमिटेड यांनी मिळकत रिकामी केल्याचे दिसून आले आहे. या बाबत इलेक्ट्रॉनिक्स् प्रायवेट लिमिटेड यांनी मिळकत रिकामी करणे बाबतचे दि.३१/०३/२०२३ रोजी मिळकतधारकास पत्र दिले आहे. तसेच सदर मिळकतीमध्ये सदयस्थितीत नवजीवन को. ऑप. बँक लि. वापर करीत असल्याचे दिसून आले आहे. सोबत मिळकतीचे छायाचित्र जोडत आहे. या बाबत वीना चंदरलाल छाब्रिया व नवजीवन को. ऑप. बँक लि. यांचे दरम्यान दुय्यम निबंधक, उल्हासनगर यांचे कार्यालयात अ.क्र. ३८८३/२०२३ दि. २७/०९/२०२३ नुसार लिव्ह अँड लायसेन्सची नोंदणी करण्यात आली आहे. सोबत प्रत जोडत आहे.

त्या अनुशंगाने उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकांत शॉप नं. ५४ मेन रोड, उल्हासनगर-४(मालमत्ता क्र. ४१सीओ००९३७३४००) व शॉप नं. ५५ मेन रोड, उल्हासनगर-४(मालमत्ता क्र.४१सीओ००९३७३५००) अन्व्ये नोंद असलेल्या मिळकतीकरिता दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०८/२०२३ या कालावधीसाठी भाडेकरी रद्द करणे तसेच दिनांक ०१/०९/२०२३ ते ३१/०३/२०२५ या कालावधीसाठी दि. २७/०९/२०२३ नुसार लिव्ह अँड लायसेन्स् मध्येनमूद केलेप्रमाणे प्रत्येकी प्रतिमाह भाडे रक्कम रु. २२,५००/- गृहित धरुन संबंधितांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ कराधान नियम यांतील नियम १५(२) नुसार कर योग्य मूल्य् निश्चित करणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

यास्त्व विषयांकित प्रकरणी मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) मनपा कर आकारणी पुस्तकांत करपात्र मालमत्ता शॉप नं. ५४ मेन रोड, उल्हासनगर-४(मालमत्ता क्र. ४१सीओ००९३७३४००) व शॉप नं. ५५ मेन रोड, उल्हासनगर-४(मालमत्ता क्र.४१सीओ००९३७३५००) अन्व्ये नोंद असलेल्या मिळकतीकरिता दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०८/२०२३ या कालावधीसाठी भाडेकरी रद्द करणे

२) तसेच दिनांक ०१/०९/२०२३ ते ३१/०३/२०२५ या कालावधीसाठी दि. २७/०९/२०२३ नुसार लिव्ह अँड लायसेन्स् मध्ये नमूद केलेप्रमाणे प्रत्येकी प्रतिमाह भाडे रक्कम रु. २२,५००/- गृहित धरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ कराधान नियम यांतील नियम १५(२) नुसार कर योग्य मूल्य् निश्चित करण्यात यावे.

(निलम चंद्रकांत कदम)

कर निर्धारक व संकलक

उल्हासनगर महानगरपालिका

प्रत- १) कोल्बो ग्रुप, नागपूर यांना योग्य् त्या कार्यवाहीसाठी,

२) विणा चंदर छाब्रिया व चंदर छाब्रिया, ७०१ अलंकार अपार्टमेंट, से-४, उल्हासनगर -४